ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारी प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २२ | पुणें, बुधवार तारीख ३० जानेवारी, १९५७ | अंक ५

## विविध माहिती

**भिलई येथें विद्युत्‌केंद्र**—भिलई येथें रशिआच्या सहकार्यानें काढण्यांत येत असलेल्या पोलादाच्या कारखान्याच्या उभारणीला आतां प्रारंभ झाला आहे. बांधकामाच्या आरंभाचें निदर्शक असें ६,००० किलोवॅट वीज निर्माण करणारें केंद्र काल सुरू करण्यांत आलें. विजेची निर्मिति तेलावर करण्यांत येत आहे. भिलई कारखान्यासाठी ११५ कोटी रुपये खर्च येईल.

**सौराष्ट्राला दूध पुरविण्याची योजना**— सौराष्ट्रमधील लोकांना भरपूर सकस दूध पुरविण्याची एक योजना आखण्यांत आली आहे. दुधाचें संस्करण' करून तें टिकविण्यासाठी १२ लाख रुपये किंमतीची यंत्रसामुग्री त्यासाठी वापरण्यांत येईल. राजकोट येथें काढण्यांत येणाऱ्या ह्या दूधकेंद्रासाठी एकूण २८ लाख रुपये खर्च येईल.

**सिकंदराबाद येथील गलिच्छ वस्त्या**— सिकंदराबाद म्युनिसिपल कॉर्पोरेशननें शहरांतील गलिच्छ वस्त्या नाहींशा करण्याचें ठरविलें आहे. ह्या 'कामासाठी ५०,००० रुपये मंजूर करण्यांत आले आहेत. भारतीय सरकार ५०,००० रुपये मदत म्हणून आणि १ लाख रुपये कर्ज म्हणून देणार आहे. कर्जाची फेड ३० वर्षांत करावयाची आहे.

**हंगेरीला लागणारी मदत**—हंगेरीमधील लोकांना लागणाऱ्या आर्थिक मदतीची पहाणी करण्यासाठी संयुक्त-राष्ट्र-संघटनेचे अधिकारी त्या देशांत गेले होते. त्यांनीं असा अंदाज केला आहे, कीं येत्या सहा महिन्यांत हंगेरीला ३ कोटी डॉलर्स किंमतीचे खाद्यपदार्थ लागतील. रेडक्रॉसतर्फे मिळणाऱ्या मदतीखेरीज इतक्या मदतीची जरूरी आहे. गहूं, साखर, खतें, गुरांचें खाद्य, ह्यांची विशेष जरूरी आहे.

**माशांचें उत्पादन वाढवा**—भारताचे शेतकीमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख क्विलॉन येथें भाषण करतांना म्हणाले कीं देशांतील माशांचें वार्षिक उत्पादन सुमारें ११ लाख टन आहे. योग्य प्रकारचा आहार राखण्यासाठी ह्या उत्पादनांत कितीतरी पटीनें वाढ होणें जरूर आहे. लोकांच्या अन्नांत माशासारख्या पुष्टिदायक पदार्थांचा अधिक समावेश झाला पाहिजे.

**विणकरांसाठी वसाहती**—भारतीय सरकारनें विणकरांची रहाण्याची सोय करण्यासाठी ४ वसाहती स्थापन करण्याचें ठरविलें आहे. सर्व वसाहतिसाठी मिळून १८.६५ लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. तीन वसाहती मद्रास राज्यांत व एक म्हैसूर राज्यांत स्थापन करण्यांत येणार आहे. घरें सहकारी तत्त्वावर बांधण्यांत येतील.

**अणुबॉंबच्या स्फोटाला हरकत**—पॅसिफिक महासागरांतील एका बेटावर वसंत ऋतूंत अणुबॉंबचा प्रायोगिक स्फोट करण्याचें ब्रिटननें ठरविलें आहे. संकल्पित स्फोटामुळें जपानच्या मच्छीमारीच्या धंद्यावर संकट कोसळणार असल्यानें जपानमधील कोळ्यांच्या संघटनेनें त्याला विरोध व्यक्त केला आहे.

**तेलाच्या वाहतुकीसाठी**—ब्रिटनमधील अणुशास्त्रज्ञ तेलाची वहातूक करण्यासाठी अणुशक्तीवर चालणारी बोट बांधण्याच्या खटपटींत आहेत. वाहतुक केप ऑफ गुडहोपला वळसा घालून करावी लागेल असें गृहीत धरून बोट जलद् गतीची व मोठी बांधण्यांत येईल. बोट 'क्वीन मेरी' ह्या प्रसिद्ध बोटीइतकी मोठी असेल.

**जहागिरदारांना नुकसानभरपाई**—आंध्र राज्य सरकारनें राज्यांतील जहागिरदारांना द्यावयाच्या नुकसानभरपाईची रक्कम निश्चित केली आहे. ६० जहागिरदारांच्या जहागिरी रद्द करण्यासाठी ३४ लाख रुपये त्यांना देण्यांत येतील. नुकसानभरपाईच्या रकमा कमींत कमी १,५०० रुपये व जास्तींत जास्त २.५ लाख रुपये इतक्या आहेत.

**बांगड्यावरील जकात रद्द करा**—ग्वाल्हेर शहरांतील मुलींच्या संघटनेनें शहराच्या मेयरना अशी विनंती केली आहे कीं बांगड्या व कुंकू ह्यांच्यावर म्युनिसिपालिटीकडून घेण्यांत येणारी जकात रद्द करण्यांत यावी. म्युनिसिपालिटीच्या उत्पन्नांत ह्यामुळें जी घट येईल ती सौंदर्यप्रसाधनांवरील जकातींत वाढ करून भरून काढण्यांत यावी असें सुचविण्यांत आलें आहे.

**भारताची इराकला मदत**—इराकमध्यें देवीची सांथ पसरल्यामुळें त्या देशांतील आरोग्य धोक्यांत आलें होतें. सांथीला आळा घालण्यासाठी इराकच्या सरकारनें भारतीय सरकारकडे देवीच्या लसीची मागणी केली होती. भारतीय सरकारनें २,००,००० डोझांना पुरेल इतकी लस विमानानें तावडतोब पाठविली आहे.

**नाशवंत अन्नपदार्थांची वाहतूक**—मासे, फळें, इत्यादी नाशवंत अन्नपदार्थांच्या वाहतुकीसाठी हवा थंड राखणारे डबे भारतीय रेल्वेच्या कांहीं मार्गांवर जोडण्यांत येत असतात. हा प्रयोग यशस्वी झाल्यास अशा प्रकारचे आणखी १४ डबे उपयोगांत आणण्याचा सरकारचा विचार आहे. अमेरिकेकडून आणखी ६ डबे मिळण्याची शक्यता आहे.

**मुलगा का मुलगी हें आधीं कळणार**—बाळाचा जन्म होण्यापूर्वी अपत्य मुलगा आहे कीं मुलगी आहे तें निश्चितपणें सांगण्याचा शोध अमेरिकेंतील मिनेसोटा विद्यापीठांतील डॉक्टरांनीं लावला आहे, असें प्रसिद्ध झालें आहे. ४४ गर्भवती मातांच्या बाबतींत त्यांचा अंदाज खरा ठरला आहे.

## व्यवसायऋणाची फेड करा

**महाराष्ट्र मुद्रणपरिषदेंत श्री. वि. अ. पटवर्धन ह्यांचें अध्यक्षीय भाषण.**

### व्यवसायऋणाची फेड

आपण छपाईकाम करून इतरांस ज्ञान मिळविण्याची सोय करतों. शिक्षणशास्त्रांतील, अगर निरनिराळ्या कलाकौशल्यांतील उत्तमोत्तम ग्रंथ छापून देऊन समाजाला ज्ञानी करण्याच्या प्रयत्नांत आपण आपला हातभार लावीत असतों. पण ‘ दिव्याखालीं अंधार ’ या म्हणीप्रमाणें मात्र आपली स्थिति आहे. आपण आपल्या मुद्रणकलेचें शिक्षण घेण्यासाठी व देण्यासाठी फारच निरपेक्ष असतों-अगदीं स्थितप्रज्ञच म्हणाना! ही स्थिति आपल्यांतील कलाप्रिय आणि शिक्षित मुद्रकांनीं बदलण्याचा प्रयत्न केला पाहिजे, एवढेंच नव्हे तर तें त्यांचें कर्तव्यच आहे. ज्या व्यवसायावर आपण आपलें जीवन व्यतीत केलें, त्या व्यवसायाचें ऋण फेडण्याची जबाबदारी प्रत्येक मुद्रकाची आहे. ज्या व्यवसायानें आपल्याला सुखी केलें, त्या व्यवसायांत पडणाऱ्या पुढील पिढीला मुद्रणाचा धंदा हा सुप्रतिष्ठित, अतिशय कल्याणकारी आणि राष्ट्राच्या जीवनांतील एक ठेवा आहे असें वाटण्याजोगी परिस्थिति सध्यांच्या मुद्रकांनीं निर्माण केली पाहिजे. राष्ट्रऋण कळतें, पितृऋण समजतें, मातृऋणानें अंतःकरण भारावतें; पण व्यवसाय-ऋण कोठें आहे? व्यवसाय-ऋण हा राष्ट्र-ऋणापैकीच एक भाग आहे. राष्ट्रऋणाची भरपाई ही प्रत्येक व्यवसायानें आपापला वाटा उचलल्याशिवाय होणार नाहीं.

राष्ट्रऋण फेडण्याचे अनंत मार्ग आहेत. कोणास कै. गोगटे यांच्याप्रमाणें संपत्तिदान करून आपल्या व्यवसायास शैक्षणिकदृष्ट्या समृद्ध करण्याची इच्छा होईल; कोणी आपल्या लेखणीचा वापर करून मार्गदर्शक वाङ्मय तयार करूं शकेल; श्री. विजापुरे, ओतुरकरांसारखे टंकज्ञाते हे नवीन टाईपाचीं वळणें तयार करून मराठी टांकसाळींत भर घालूं शकतील; श्री. मामाराव दाते यांच्यासारखे सव्यसाची मुद्रक ‘ मुद्रणप्रवेशा ’सारखे ग्रंथ लिहून आणि मोनो टाईप मशीनप्रमाणें लायनो टाईप तयार करून मराठी मुद्रणकला उंचावतील. कलात्मक प्रकाशक मुद्रकांना मार्गदर्शन करून मराठी मुद्रणाचा दर्जा वाढविण्यास मदत करूं शकतील. अशा तऱ्हेच्या विविध आवडीच्या मुद्रणसेवकांच्या खटपटीनें राष्ट्रऋणांतील मुद्रकांचा वाटा उचलला जाऊं शकेल. या ऋणांतील जो भाग ज्याला झेपेल, तो त्यानें उचलावा.

### महाराष्ट्रांतील मुद्रणाचा धंदा

आपल्या मुद्रणधंद्याकडे पाहिल्यास जुन्या मुंबई राज्यांतील एकूण २,१९४ छापखान्यांपैकी फक्त ३४ छापखाने असे आहेत कीं, ज्यांमध्यें १०० पेक्षा जास्त कामगार आहेत; २१९४ छापखान्यांतील २७,७५४ कामगारांपैकी या ३४ छापखान्यांतून ११,३२४ कामगार आहेत. म्हणजे बाकी राहिलेल्या शंभरांपेक्षा कमी कामगार असलेल्या २,१६० छापखान्यांत १६,४३० कामगार आहेत; म्हणजे दर मुद्रणालयामागें आठ कामगार एवढेंच प्रमाण पडतें. हे आंकडे झाले जुन्या मुंबई राज्यांतील मुद्रणालयांचे. आपली परिषद आज ज्या जिल्ह्यांतील मुद्रकांची भरलेली आहे, त्या जिल्ह्यांतील परिस्थिति काय आहे हें पाहणेंहि मोठें बोधप्रद होईल. मुंबई-बेळगांवसह महाराष्ट्रांतील १४ जिल्ह्यांतून १,५९६ छापखाने असून त्यामध्यें २४,५५९ कामगार आहेत. यांपैकी ३० छापखाने १०० पेक्षा जास्त कामगार असलेले आहेत आणि त्यांतून १०,६४६ कामगार आहेत. म्हणजे बाकी राहिलेल्या १५,६६ छापखान्यांतून १३,३१३ कामगार काम करीत आहेत. यांपैकी १० पेक्षा कमी कामगार असलेले छापखाने ८९७ असून त्यामध्यें ३,९०० कामगार काम करीत आहेत. या सर्व आंकड्यांवरून असें दिसेल कीं आपला मुद्रणधंदा हा छोट्या प्रमाणावर चालणारा व्यवसाय आहे. पण या धंद्यास कायदे लावावयाचे ते मात्र मोठमोठ्या कारखानदारांचे. अशा लहान औद्योगिक घटकांत मालकाचें आपल्या तुटपुंज्या कामगारांवांचून चालणार तरी कसें? तो त्यांची पिळवणूक तरी कशी करणार आणि करणार किती?

---

## मुंबई राज्यांतील लिमिटेड कंपन्या

### ३१ डिसेंबरला संपलेला सहामाहीचा अहवाल

दि. ३१ डिसेंबर १९५६ रोजीं संपलेल्या सहामाहींत, रजिस्ट्रार ऑफ कंपनीज, मुंबई यांच्या कचेरींत एकूण २५,१५,००,००० रु. अधिकृत भांडवलाच्या ११ पब्लिक लि. व एकूण ७,७७,१६,००० रु. भांडवलाच्या ८२ प्रायव्हेट लि. कंपन्यांची नोंद झाली.

ह्याच मुदतींत एकूण वसूल भांडवल २७,९०० रु. असणाऱ्या पांच प्रायव्हेट कंपन्यांचें व वसूल भांडवल ४,००० रु. असलेल्या एका पब्लिक लि. कंपनीचें व नफ्यासाठीं नसणाऱ्या एका असोसिएशनचें नांव १९५६ च्या कंपनी कायद्याच्या ५६० व्या कलमान्वयें रद्द करण्यांत आलें.

ह्याखेरीज ४ पब्लिक लि., ३ प्रायव्हेट व एक गॅरेंटीनें लि. असलेली अशा एकूण ८ कंपन्यांचीं दिवाळीं निघालीं. तसेंच एक पब्लिक लि. व ६ प्रायव्हेट लि. कंपन्यांचा कारभार ह्याच काळांत संपूर्णतः संपुष्टांत आला.

अहवालाच्या कालावधींत कंपन्यांविरुद्ध व कंपन्यांच्या संचालकांविरुद्ध, तसेंच इतर अधिकाऱ्यांविरुद्ध २१ खटले भरण्यांत आले होते. त्यांपैकी दहा तर कायद्याप्रमाणें वार्षिक हिशेबाचे तक्ते न पाठविल्याबद्दल होते.

ह्या कालावधींत एकूण ७४ प्रकरणांचे निकाल लागले. त्यामध्यें ९ कंपन्यांना व ३२ कंपन्यांच्या संचालकांना व अधिकाऱ्यांना शिक्षा होऊन प्रत्येकीं रु. २५ पासून १५० रुपयांपर्यंत दंड ठोठावण्यांत आले. कंपनी कायद्याच्या विविध तरतुदींचा भंग केल्याच्या आरोपांवरून हे खटले भरण्यांत आलेले होते.

तमाम दंतरोगांवर
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

# अर्थ

बुधवार, ता. ३० जानेवारी, १९५७





संस्थापक : प्रो. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे


### उत्पादनाच्या आघाडीवरील लढाई

गेल्या कांहीं वर्षांत रशिआ आणि अमेरिका ह्या दोन बलाढ्य राष्ट्रांत आर्थिक दृष्ट्या अप्रगत राष्ट्रांना मदत देऊन आपल्या बाजूला वळवून घेण्याची स्पर्धा लागलेली आहे. ह्या स्पर्धेंत कोण विजयी होतो तें काळच ठरवील. औद्योगिक दृष्ट्या मागासलेल्या राष्ट्रांना रशिआपेक्षा अमेरिकाच अधिक मदत करूं शकेल असा विश्वास अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री श्री. डलेस ह्यांनीं नुकताच व्यक्त केला आहे. तथापि, रशिआनें औद्योगिक उत्पादनाच्या बाबतींत अमेरिकेशीं एकप्रकारची लढाईच चालविलेली दिसून येते. सोव्हिएट रशिआच्या औद्योगिक उत्पादनासंबंधीं अमेरिकेंतील कोलंबिआ विद्यापीठानें एक अहवाल तयार केला आहे. त्यावरून असें दिसून येत आहे कीं, रशिआंतील औद्योगिक प्रगतीचा वेग अमेरिकेच्या दुप्पट आहे. पश्चिम युरोपांतील देशांशीं तुलना करतां तर हा वेग तिप्पट असल्याचें आढळून आलें आहे. अहवालांतील माहितीप्रमाणें रशिआ आज तरी युद्धसाहित्याच्या उत्पादनावर अधिक भर देत आहे. असें असलें तरी लवकरच भांडवली माल व यंत्रसामुग्री ह्यांचें उत्पादन रशिआंत भरपूर होऊं लागेल आणि ह्या मालाची निर्यात करून रशिआ लोकशाही राष्ट्रांशीं स्पर्धा करूं लागेल, असा अंदाज करण्यांत आला आहे. सध्यां मात्र दरमाणशीं दरताशीं होणाऱ्या उत्पादनाच्या बाबतींत अमेरिका रशिआपेक्षा खूपच पुढें आहे. पण ह्याहि बाबतींत एक मुद्दा लक्षांत घेण्यासारखा आहे. रशिआंतील दरमाणशीं दरताशीं उत्पादन सहा टक्क्यांनीं वाढत आहे, तर अमेरिकेंतील तीन टक्क्यांनींच वाढत आहे.

---

### ब्रह्मदेशाला रशिआची तांत्रिक मदत

१९५५ सालच्या डिसेंबर महिन्यांत रशिआचे पंतप्रधान मि. बुल्गॅनिन ब्रह्मदेशाच्या दौऱ्यावर आले होते. त्यावेळीं त्यांनीं ब्रह्मदेशाचे पंतप्रधान श्री. ऊ नू ह्यांना तांत्रिक साह्याचें आश्वासन दिलें होतें. ह्या आश्वासनाची पूर्ती करण्यासाठी गेल्या नोव्हेंबर महिन्यांत रशिआचें आर्थिक शिष्टमंडळ ब्रह्मदेशांत गेलें. आतां उभयतां देशांतील व्यापारी करारावर सह्या करण्यांत आल्या आहेत. करारांतील मसुद्याप्रमाणें रशिआ ब्रह्मदेशाला तांत्रिक शिक्षणाची संस्था उभारून देणार आहे. त्याचप्रमाणें एक इस्पितळ, एक नाट्यगृह, एक सभागृह, एक हॉटेल, एक पोहण्याचा तलाव आणि शेती व औद्योगिक प्रदर्शनासाठी इमारती, इतक्या गोष्टींची तरतूद करणार आहे. त्यांतल्या त्यांत तांत्रिक शिक्षणसंस्था, हॉटेल व इस्पितळ ह्यांना अग्रहक्क देण्यांत येणार आहे. तांत्रिक शिक्षणाच्या संस्थेंत १,००० विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय होईल व पदवीनंतरचा अभ्यास करणाऱ्या १०० विद्यार्थ्यांनाहि मार्गदर्शन करण्यांत येईल. इस्पितळांत २०० रुग्णांची सोय करण्यांत येईल. रुग्णालयाला बाह्यरुग्ण विभागाची जोडहि देण्यांत येईल. नाट्यगृहांत १,८०० प्रेक्षकांची व खेळाच्या आखाड्यांत ५०,००० प्रेक्षकांची बसण्याची व्यवस्था होईल. हॉटेलमध्यें २०० खोल्या असतील. हा सर्व बांधकामाचा कार्यक्रम १९६३ च्या सुमारास पूर्ण होईल. ब्रह्मदेश फक्त मजूर व कसबी कामगार पुरवील. तांत्रिक शिक्षणाच्या शाळेंत अध्यापनाचें काम करणारे शिक्षक रशिआंत शिकवून तयार करण्यांत येतील. तीच गोष्ट इस्पितळांतील नोकरवर्गाची. उलटपक्षीं, ब्रह्मदेश रशिआला तांदूळ व इतर कांहीं माल योग्य तो मोबदला म्हणून पुरविणार आहे. रशिआच्या व्यापारी प्रतिनिधींनीं बांधकामाच्या जागांची पहाणी पुरी केली आहे.

---

### भारताच्या आर्थिक विकासाची दिशा

मुंबईतील एक प्रसिद्ध उद्योगपति श्री. ए. डी. श्रॉफ ह्यांनीं 'फोरम फॉर फ्री एंटरप्राइझ' ह्या नांवाची संघटना उभारली आहे. भारताच्या आर्थिक विकासांत खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांना योग्य तें स्थान असावें म्हणून संघटनेतर्फे प्रचार करण्यांत येत असतो. श्री. श्रॉफ केरळमधील आपल्या दौऱ्यावर असतांना अर्णाकुलम् येथें त्यांनीं पत्रकारांना एक मुलाखत देऊन आपले विचार व्यक्त केले. ते म्हणाले कीं देशाची औद्योगिक प्रगति योजनाबद्ध रीतीनें आणि झपाट्यानें व्हावी ह्या मुद्याबद्दल फोरम व सरकार ह्यांच्यांत मतभेद नाहींत. देशाचा औद्योगिक विकास मोठ्या प्रमाणावर व्हावा आणि उत्पादित धनाची न्याय्य वांटणी करण्यांत येऊन लोकांचें जीवनमान सुधारावें ह्याबद्दल वाद नाहीं. पण हें साध्य प्रत्यक्षांत उतरविण्यासाठी सरकार जे उपाय अंमलांत आणीत आहे त्याबद्दल मात्र मतभेद आहे. सार्वजनिक मालकीच्या विभागाचा विस्तार करण्यास फोरमचा विरोध आहे. कारण, ह्या विभागाचा विस्तार झाल्यास अधिकाधिक लोकांना आपल्या अन्नवस्त्रासाठी सरकारवर अवलंबून रहावें लागेल. सरकारची ही प्रवृत्ति भारतामधील लोकशाहीला फार धोक्याची आहे. भारतीय सरकारनें आपल्या पुढें ठेवलेल्या समाजवादी मार्गानें धनाच्या उत्पादनांत वाढ होणार नाहीं. सरकारनें स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन्स स्थापन केलीं आहेत. खाजगी भांडवलाच्या कार्यक्षेत्रावर हें मोठें आक्रमण आहे. देशाची औद्योगिक प्रगति नियोजनाच्या पद्धतीनें होण्यासाठी कांहीं प्रकारचें सरकारी नियंत्रण आवश्यक आहे. पण सरकारच्या हस्तक्षेपामुळें पुढाकार घेण्याची वृत्ति विरून जात असेल तर मात्र तें योग्य म्हणतां येणार नाहीं.

---

**साखरेचा सहकारी कारखाना** — बेळगांव जिल्ह्यांत संकेश्वर येथें सहकारी तत्त्वावर चालणारा साखरेचा सहकारी कारखाना काढण्यांत येणार आहे. कारखान्यासाठी ६५ लाख रुपये भांडवल लागेल. त्यांपैकी १० लाख रुपये सार्वजनिक रीत्या जमविण्यांत येईल, १० लाख रुपये म्हैसूरचें सरकार देईल आणि बाकीचें भारतीय सरकारच्या इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनकडून मिळविण्यांत येईल.

## इक्विटेबल मॉर्टगेज (न्यायमूलक गहाण) च्या व्यवहारांची सोय आणखी शहरांना द्या.

### नोंदणीची आवश्यकता

### नवीन कायदासमितीस एक सूचना

(लेखक :—श्री. नारायण विनायक भोंडे, पुणें)

कांहीं महिन्यांपूर्वी केंद्रीय सरकारनें एक कायदासमिति नेमली असून कॉंट्रॅक्ट, निगोशिएबल इन्स्ट्रुमेंटस्, लिमिटेशन, वगैरे कायद्यांत बदल करावे कीं कसे, याचा विचार करणेसाठीं समितीनें एक प्रश्नावलीहि संबंधी संस्था व कायदेपंडित यांजकडे पाठविली आहे. ब्रिटिश राजवटीनें पीनल, क्रिमिनल, सिव्हिल प्रोसीजर कोड, तसेंच देवघेवीचे व्यवहार व संस्थांबाबत जे कायदे केले त्यांत पाश्चात्य राष्ट्रांतील न्यायविषयक अनुभवाचा व ज्ञानाचा उपयोग, तसेंच त्यांचे संकेत व प्रघात याची प्रतिष्ठा कायम ठेवून ते बनविलेले आहेत. ते प्रसृत झाल्यानंतर परिस्थितींत पुष्कळच बदल झाला असून, समाजाची प्रगति, व्यापाराचा विकास, देवघेवींची सुलभता व गुंतविलेल्या पैशाची सुरक्षितता ह्या बाबी लक्षांत घेऊन त्यांत फरक व तेहि जपून करणें आवश्यक आहे. त्यांपैकी एक नित्य भाग म्हणजे स्थावर मिळकतींचे तारणावर पैसा कर्जाऊ घेणें हा होय. सांप्रत मुंबई, मद्रास, कलकत्ता ह्या शहरीं व राज्य सरकार जाहीर करील अशा आणखी शहरीं, ऋणकोनें काढलेल्या कर्जास तारण देण्याच्या हेतूनें आपल्या स्थावर मिळकतीचे दस्तैवज धनकोजवळ ठेव म्हणून दिल्यास तो व्यवहार लख्ख गहाणाचा समजला जातो. त्यास 'न्यायमूलक गहाण' अथवा इक्विटेबल मॉर्टगेज संबोधलें जातें.

कर्जाऊ रक्कम लाखांनीं दिली असली व तारण घर-जमिनीची किंमत कितीहि असली, तरी कर्ज तारण निर्माण करण्याचा उद्देश व भोगवटयाचे कागदाची ठेव ही असल्यास असा व्यवहार रजिस्टर करावा लागत नाहीं. मिळकत अगर पक्षकार हे कोणत्याहि शहरांतील अगर खेड्यांतील असले तरी चालतील. फक्त त्यांनीं तारण मिळकतीचे दस्तैवज घेऊन मुंबईस गेलें पाहिजे. व्यापारी व हरहुन्नरी व्यापाराचे सुलभतेकरतां व कर्ज काढल्याची वाच्यता टाळण्याकरितां ही सोय उघडाउघडी केली आहे. पण ह्यांत दोन दोष आहेत. पैकीं एक गोष्ट म्हणजे फक्त तीन राजधान्यांचेच जागीं हे व्यवहार होऊं शकतात. मध्यवर्ती सरकार अगर राज्यसरकार यांनीं ह्या सवलतीचा फायदा उद्दीम वाढलेल्या अहमदाबाद, हुबळी, बडोदा, वगैरे शहरांस दिलेला नाहीं. तेथील पेढ्या, विमा कंपन्या व बँका असें इक्विटेबल मॉर्टगेजचे बिननोंदणीचे व्यवहार करीत नाहींत, असें नाहीं. तेव्हां वरील तीन राजधानींच्या शहरांखेरीज दिल्ली, कानपूर, नागपूर, वगैरे शहरांचा उल्लेख कायद्यांत करणेस हरकत नाहीं. एकाकाळीं युरोपियन व्यापारांचे घडामोडींचीं केंद्रें म्हणून घरलेल्या राजधान्या यांच्यापुरतीच ही सवलत मर्यादित ठेवूं नये. तिचें क्षेत्र वाढवावें.

पण ह्या व्यवहारांत दुसरा दोष व लबाडीलाहि वाव आहे. तो असा कीं, ऋणको-धनकोंनीं हा गुपचिप व्यवहार करून वाटेल ती तारीख दर्शविल्यास ऋणकोचे अगोदरचे इतर धनको बुडण्याची शक्यता आहे. सबब असें इक्विटेबल मॉर्टगेजेस रजिस्टर कचेरींत (स्टॅम्प न देतांहि) निदान नोंदविणेचा दंडक तरी ठेवला पाहिजे. हल्लींहि मुखत्यारपत्रें त्यांतील सर्व मजकूर उद्धृत न करतांहि रजिस्टर कचेरींत नमूद करण्याची व्यवस्था आहे. तशी तरतूद दस्तैवज ठेव देऊन गहाण निर्माण करण्याचे व्यवहारास लागूं केल्यास व सिटी सर्व्हेकडे व हक्कनोंदणीकडे हे व्यवहार नमूद करविल्यास प्रामाणिकपणा व सुरक्षितता यांस तो पोषक ठरेल. कर्ज घेतल्याची वाच्यता न होणें हें जर कर्जदारास इष्ट, तर त्याचे इतर धनकोस त्याची सांपत्तिक स्थिति खरीखुरी समजणें हेंहि युक्तच होय. अशा नोंदीची फी कर्जाऊ घेतलेल्या रकमेच्या प्रमाणानें योग्य अशी सरकारनें अगर संबंधी खात्यानें ठरवावी. खेड्यांतील दोनशें रुपयांचे गहाण व्यवहारास जर स्टॅम्प व रजिस्ट्रेशन फी द्यावी लागते, तर राजधान्यांच्या लाखों रुपयांच्या तारण व्यवहारास नुसत्या नोंदणीचीसुद्धां आवश्यकता कां ठेवूं नये?

---

### ग्रामोद्योगांतील वस्तूंचा खप वाढविण्याची योजना

उत्तर प्रदेशाच्या सरकारनें राज्यांतील ग्रामोद्योगांत तयार झालेल्या वस्तूंचा खप अधिक वाढविण्यासाठीं एक पंचवार्षिक योजना आंखली आहे. ग्रामोद्योगांत तयार झालेल्या पुष्कळ वस्तू अशा असतात कीं त्यांची योग्य ती माहिती लोकांना मिळाल्यास त्या खपूं शकतात. परंतु प्रसिद्धीच्या अभावीं ह्या वस्तू खपविणें अवघड होऊन बसतें. ह्या वस्तूंच्या विक्रीसाठीं राज्यांत व राज्याबाहेर अनेक ठिकाणीं केंद्रें स्थापन करण्याचें सरकारनें ठरविलें आहे. केंद्रांच्या ठिकाणीं ह्या विविध प्रकारच्या वस्तू कांचेच्या कपाटांतून मुद्दाम ठेवण्यांत येणार आहेत. वस्तूंची विक्री वाढविण्याच्या ह्या कार्यक्रमासाठीं ५६·४५ लाख रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. चालू आर्थिक वर्षांत आग्रा, हैदराबाद, इंदूर व जमशेटपूर ह्या ठिकाणीं शोरूम्स उघडण्यांत यावयाच्या आहेत. आग्रा येथील शोरूम ताजमहालाच्या आवारांत ठेवण्यांत येणार आहे. ताजमहाल पहाण्यासाठीं येणाऱ्या प्रवाशांच्या पैशाच्या पिशवीचा फायदा त्यामुळें सहजासहजीं घेतां येईल. उत्तर प्रदेशाचें सरकार आपल्या ग्रामोद्योगाच्या व हस्तव्यवसायाच्या खात्यामार्फत सुमारें ५० लाख कामगारांना मदत करीत असतें. गरिबांच्या छोट्या झोपड्यांतून तयार झालेल्या अनेक चांगल्या वस्तू सरकार योग्य भावांत विकत घेतें आणि त्यांच्या विक्रीची व्यवस्था करतें. त्याचप्रमाणें ग्रामोद्योगांतील कामगारांना नवीन नमुने व सुधारलेलीं हत्यारें देऊन त्यांच्याकडून उत्पादनांत सुधारणा घडवून आणतें. १९५५–५६ ह्या सालांत सरकारच्या ह्या खात्यानें ११ लाख रुपये किंमतीच्या मालाची विक्री केली.

---

**हिंदी वाङ्मयाचा इतिहास**—बनारस येथील काशी नागरी प्रचारिणी सभेनें हिंदी वाङ्मयाचा तपशीलवार इतिहास प्रसिद्ध करण्याचें ठरविलें आहे. सुमारें ६०० पृष्ठांचा एक, असे १७ खंड तयार करण्यांत येणार आहेत. ह्या कामासाठीं ३,७७,००० रुपये खर्च येईल आणि तें पूर्ण होण्यास ८ वर्षांचा अवधी लागेल.

**राजकोटमध्यें घरांची टंचाई**—राज्यपुनर्रचनेनंतर राजकोट शहरांतील राहण्याच्या जागेची टंचाई कांहीं प्रमाणांत घटेल अशी अपेक्षा करण्यांत येत होती. पण तसें कांहीं घडून आलें नाहीं. पश्चिम रेल्वेची प्रादेशिक कचेरी त्या शहरांत उघडण्यांत आल्यामुळें टंचाई कायम राहिली आहे असें म्हणतात. घरांच्या भाड्यांत ३० ते २०० टक्के वाढ झाली आहे.

## दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचें यश साधनसंपत्ति एकवटण्यावर अवलंबून

### छोट्या बचतींची आवश्यकता

पहिल्या पंचवार्षिक योजनेंतील लक्ष्यें गांठण्यांत आल्यानें दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील लक्ष्येंहि गांठता येतील अशी आशा निर्माण झालेली आहे. भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नापैकीं अनेक कारणांमुळें अवघी सहा टक्के रक्कम पुनर्गुंतवणुकीसाठीं सध्यां उपलब्ध असते. इंग्लंड, प. जर्मनी आणि रशिआ यांसारखीं राष्ट्रें त्यांच्या राष्ट्रीय उत्पन्नापैकी जवळजवळ १५ ते २० टक्के रक्कम बचत करून पुन्हां गुंतवितात.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत सरकारी क्षेत्रांत ४,८०० कोटी रु. खर्च करण्याची पहिली योजना होती. तथापि पोलादाचे तीन कारखाने स्थापन करण्यासंबंधींच्या त्यानंतरच्या घडामोडींमुळें आणि अलिकडील आंतरराष्ट्रीय घटनांमुळें सरकारी क्षेत्रांतील खर्च आणखी ४०० ते ५०० कोटी रु. नीं वाढेल असा अंदाज आहे.

भारतासारख्या देशाच्या मानानें हा खर्च फार मोठा आहे. परदेशांकडून येणाऱ्या साह्यावर फार अवलंबून राहतां येणार नाहीं. खरें म्हणजे कोणत्याही राष्ट्राचें सामर्थ्य त्यांतील जनतेच्या प्रयत्नांतून व कष्टांतून साकार होत असतें. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचें यश तिच्यासाठी लागणारी साधनसंपत्ति एकवटण्याचे कामांत यश येण्यावर बऱ्याच प्रमाणांत अवलंबून आहे. दुसरी पंचवार्षिक योजना यशस्वी करावयाची असेल तर पुनर्गुंतवणुकीसाठीं लागणाऱ्या बचतीचें शेंकडा प्रमाण आणखी वाढविलें पाहिजे.

देशांतील अवघे १॥ टक्का इतके लोक पोस्टांत आपली शिल्लक ठेवतात यावरून या देशांतील छोट्या बचतीच्या आवाक्याची कल्पना येईल. इंग्लंडमधील हेंच प्रमाण ५० टक्के पडतें. सेव्हिंग्ज बँका, वगैरे संस्थांतील लोकांची रक्कम त्या देशांत सुमारें ६,००० कोटी रु. आहे. आपल्या देशाच्या सरकारी क्षेत्रांतील खर्चाच्या ऐकूण रकमेपेक्षांहि हा आंकडा बराच अधिक आहे. छोट्या बचतींनें राष्ट्रकार्यास तर हातभार लागतोच पण त्याचबरोबर खुद्द बचतदार आणि त्याच्या कुटुंबांतील मंडळी यांनाहि त्यांतून चांगली प्राप्ति होते. त्यावर प्राप्तीकर नसतो. छोट्या बचतदारास पैसे गुंतविणें सुलभ व्हावें म्हणून अनेक योजना सुरू केलेल्या आहेत. बचतीकरितां असलेल्या सर्वसाधारण अधिकृत एजन्सीव्यतिरिक्त केवळ ग्रामीण विभागांसाठी कांहीं एजन्सीच्या योजना चालू करण्यांत आल्या आहेत. अशा प्रकारच्या विविध योजनांमुळें प्रत्येक नागरिकास कांहींना कांहीं रोख रक्कम शिल्लक टाकणें सोपें होईल. अशा बचतीमुळें राष्ट्रहित साधेल, इतकेंच नव्हे तर खुद्द बचतदाराचें भवितव्य अधिक सुरक्षित व चांगलें होऊं शकेल.

भारतांतील प्रत्येक स्त्रीनें, पुरुषानें आणि बालानें वर्षभरांत केवळ ५ रु. शिल्लक टाकले तर देशास प्रतिवर्षी १८८ कोटी रु. हून अधिक रक्कम मिळूं शकेल. म्हणजेच, पांच वर्षांत ९४० कोटी रु. अगर दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत छोट्या बचतीचें लक्ष्य जें ५०० कोटी रु. ठरविलें आहे त्याच्या जवळजवळ दुपटीइतके पैसे उभे रहातील. अंतर्गत साधनें वाढविण्यासाठीं जादा उपाय योजून जी ४०० कोटी रु. ची तफावत भरून काढावयाची आहे, तीहि यामुळें भरून निघेल.

### हुंड्यांवरील वाढलेली स्टँप ड्यूटी

हुंड्यांवरील स्टँप ड्यूटीचा नवा वाढवलेला दर १ फेब्रुवारी, १९५७ पासून अंमलांत येणार आहे. ५०० रुपयांपर्यंतच्या व ३ महिने पर्यंतच्या मुदतीच्या हुंड्यांवर १ रु. ४ आ. पासून ते १ वर्षापर्यंतच्या मुदतीच्या हुंड्यांवर १० रु. पर्यंत ह्या नव्या दरांची कक्षा आहे. तथापि, ह्या नव्या दरांच्या निम्म्यानेंच प्रत्यक्ष दर रहातील, असें जाहीर झालें आहे.

### आर्किटेक्ट 'पद्मश्री' झाले

मद्रास येथील आर्किटेक्ट श्री. एल. एम्. चितळे ह्यांना प्रजासत्ताक दिनाचे दिवशीं "पद्मश्री" करण्यांत आलें आहे.

### स्टेट बँकेचा नफा

स्टेट बँक ऑफ इंडियाला १९५६ मध्यें १,५६,१८,२०० रु. नफा झाला. त्यांत मागील शिलकी नफा मिळविला, म्हणजे नफा वाटणीला १९१ लक्ष रुपये येतात. भागदारांना १६% डिव्हिडंड मिळणार आहे. बँकेच्या शेअरची दर्शनी किंमत १०० रु. आहे, पण तो ३५० रुपयांना देण्यांत आलेला आहे. म्हणजे, ३५० रुपयांवर १६ रु डिव्हिडंड सुटेल.

### निवडणुकीस दर मतदारामागे ४ आणे खर्च

आतां होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीस सरकारला दर मतदारामागें ४ आणे एवढा खर्च येणार आहे. गेल्या, १९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकींत तो ९½ आणे आला होता. मतदारांची संख्या १८ कोटींची १९ कोटी झाली आहे. मतदानाच्या नव्या पेट्यांचा खर्च आतां पुनः करावा लागणार नाहीं.

### शाळांतील अभ्यासक्रमांत 'पंचवार्षिक योजना'

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेविषयक माहिती येत्या वर्षापासून माध्यमिक शाळांच्या अभ्यासक्रमांत आवश्यक केली जाणार आहे. मध्यवर्ती सरकार एक पाठ्य-पुस्तक तयार करीत आहे, त्याचीं भाषांतरें राज्य सरकारें करून घेतील व शाळांत तें पुस्तक लावलें जाईल.

### युनायटेड कमर्शिअल बँक लि.

वरील बँकेस १९५६ मध्यें ५६·५२ लक्ष रु. नफा झाला. त्यांत शिलकी नफा मिळवला म्हणजे नफा वाटणीस ५६·७९ लक्ष रुपये येतात. प्रत्येक भागास करमाफ ३ रु. ८ आ. डिव्हिडंड मिळणार आहे.

२५ जानेवारी रोजीं बँकेच्या पिंपरी शाखेचा उद्घाटन समारंभ झाला.

### दि बेळगांव बँक लि. मधील समारंभ

दि बेळगांव बँक लि. चा वर्षदिन रविवार, दि. २७ रोजीं साजरा झाला. त्यावेळीं, बँकेच्या रिक्रिएशन क्लबाचें उद्घाटन करण्यांत आलें.

**उटकमंड येथील फिल्मचा कारखाना**—सिनेमासाठी लागणारी फिल्म व छायाचित्रें घेण्यासाठी लागणारें साहित्य तयार करण्याचा एक कारखाना उटकमंड येथें काढण्याचा भारतीय सरकार विचार करीत आहे. रंगाचारी कमिटीनें पूर्वी असा कारखाना भारतांत कोठें काढतां येईल ह्याविषयीं चौकशी केली होती.

## गुजरातमधील प्रमुख सहकारी संस्था

( लेखांक चौथा )

लेखक :—श्री. ल. का. कुलकर्णी, बी. ए.
C/o को. ऑपरेटिव्ह ट्रेनिंग कॉलेज, पुणें १.

### ८ अहमदाबाद सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. अहमदाबाद

बँकेची स्थापना दि. ९-३-१९२५ रोजीं झाली. त्यावेळीं बँकेचें नांव दशक्रोई बँकिंग युनियन असें होतें. बँकेचें कार्यक्षेत्र एका तालुक्यापुरतें मर्यादित होतें. १९३७ सालीं बँकेचें वरील-प्रमाणें नामकरण झालें. १९४० सालानंतर रेशनिंगच्या काळांत बँकेच्या कार्याचा व्याप सारखा वाढत गेला. १९५४ सालीं बँकेला सध्यांचें स्वरूप प्राप्त झालें.

बँकेचें वैशिष्ट्य म्हणजे ही बँक जिल्ह्याची मध्यवर्ती ( सेंट्रल फिनॉन्सिंग एजन्सी ) बँक आहे. सहकारी सोसायट्या ह्याच बँकेच्या सभासद आहेत. व्यक्तिगत सभासदांना येथें वाव नाहीं.

बँकेचें शेअर भांडवल रु. ७,६८,३५० असून रिझर्व्ह फंड रु. ४,८५,३७९ आहे. ठेवी रु. पन्नास लाखावर आहेत. बँक सतत १० वर्षे 'अ' वर्गात आहे. याचें कारण म्हणजे सोसायट्यांना दिलेलीं कर्जें वेळेवर वसूल होतात; मुदतीबाहेर जात नाहींत अगर बुडीतहि होत नाहींत. गतवर्षी शेतीसाठी रु. ६४,५९,३६१ कर्जाऊ देण्यांत आले त्यांपैकीं रु. ६०,२५,३५६ म्हणजे शेंकडा ९३·३% वसूल झाले. यावरून बँकेच्या सभासद सोसायट्यांची कार्यक्षमता लक्षांत येतें. रिझर्व्ह बँकेनें तीस लाख रुपयांचें कर्ज सदर बँकेस मंजूर केलेलें आहे. यांपैकीं फक्त वीस लाख रुपये बँकेनें उचललें व तेंहि वेळेवर परत केलें.

योग्य त्या वेळीं कर्जाऊ रकमा देणें व योग्य त्या वेळींच वसूल करणें यावर सहकारी पतपुरवठ्याचें यश अवलंबून असतें. सदर बँकेचा जोर यावर विशेष असल्यामुळें आर्थिक स्थिति मजबूत राहिली असून गतवर्षी बँकेस निव्वळ नफा रु. १,४५,५९० झालेला आहे.

### ९ अहमदाबाद जिल्हा औद्योगिक सहकारी मंडळ लि. अहमदाबाद

मंडळाची स्थापना १९३७ सालीं झाली. इतर जिल्हा औद्योगिक सहकारी मंडळाप्रमाणें हें मंडळ विणकरांना कच्चा माल पुरविणें, त्यांनीं तयार केलेल्या मालाची विक्री करणें, इत्यादि कामें करतें. मंडळाचे ५८३ सभासद आहेत. पैकीं ३० सोसायट्या आहेत. हातमागधंद्याला उत्तेजन मिळण्यासाठी विविध प्रकारचें नाविन्यपूर्ण कापड तयार केलें जातें. येथील अंथरुणाच्या चादरी फार प्रसिद्ध आहेत. १९४६-४७ सालीं रु.२६,६८६ किंमतीच्या व १९४७-४८ सालीं रु. १०,४८३ किंमतीच्या चादरी ( बेडशीटस् ) ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड येथें निर्यात करण्यांत आल्या.

मंडळाचें शेअर भांडवल रु. ९,७०० असून रिझर्व्ह फंड रु. ३३,१०३ आहे. गतवर्षी कापड, सूत वगैरेंची विक्री रु. २,३७,९०० रु. झाली. निव्वळ नफा रु. १०,८९७ झाला.

याशिवाय अहमदाबाद येथें हाजा पटेल पोल को. ऑप. कंझ्युमर्स सोसायटी लि.; विद्यानगर को. ऑप. हाऊसिंग सोसायटी लि.; अहमदाबाद को. ऑप. फ्रूट अँण्ड व्हिजिटेबल ग्रोअर्स असोसिएशन लि. या उल्लेखनीय सहकारी संस्था आहेत. कंझ्युमर्स सोसायटीचा व्यवहार अत्यंत चोखपणें चाललेला आहे. धान्याच्या मोसमांत धान्य घाऊक प्रमाणांत खरेदी केल्यामुळें व नंतर वर्षभर किरकोळीनें विक्री केल्यामुळें ( मुख्यतः गहूं, तांदूळ यांची ) नफ्याचें प्रमाण ( मार्जिन ) बरेंच राहतें. विद्यानगर हाऊसिंग सोसायटी पांच वर्षांपूर्वी स्थापन झाली तरी तिची प्रगति वाखाणण्याजोगी आहे. फ्रूट अँण्ड व्हिजिटेबल ग्रो. सोसायटींत शेतकऱ्यांच्या फळफळावळांची विक्रीपद्धतशीरपणें केली जाते. दलालांचें वर्चस्व नष्ट करण्यांत आलें आहे. शेतकऱ्यास त्याच्या मालाचा जास्तींत जास्त मोबदला दिला जातो. सोसायटीचें शेअरभांडवल रु. १७,३७० असून सभासदांची संख्या ९६५ आहे.

**बिहारचा पंचवार्षिक कार्यक्रम**—बिहारचें सरकार दुसऱ्या पंचवार्षिक योजनेवर करणार असलेल्या खर्चापैकीं ३७ कोटी रुपये रक्कम १९५७-५८ ह्या वर्षी खर्च करणार आहे. विकासाच्या कार्यक्रमांत शेतीला अग्रहक्क देण्यांत आला आहे. १९५७-५८ सालीं शेतीवर ४ कोटी रुपये खर्च करण्यांत यावयाचे आहेत.

**भारतीय विमानांना बाजार पेठ**—बंगलोर येथील हिंदुस्थान एअर क्रॅफ्ट कंपनीनें "एच २" प्रकारचें शिकाऊ विमान तयार केलेलें आहे. ह्या विमानांना ऑस्ट्रेलिआंत बाजारपेठ मिळूं शकेल असें समजतें. हें विमान स्वस्त, खात्रीचें व कमी जळण लागणारें असल्याचा अभिप्राय व्यक्त करण्यांत आला आहे.


## नोटीस

### दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड.

नोटीस देण्यांत येतें कीं, बँकेच्या भागीदारांची बाविसावी वार्षिक साधारण सभा मंगळवार दिनांक २६ फेब्रुवारी, १९५७ ला सायंकाळीं ४ वाजतां ( स्टँ. टा. ) बँकेचें रजिस्टर्ड ऑफिस, ८९८ सदाशिव पेठ, पुणें शहर या ठिकाणीं खालील कामासाठी भरेल.

( १ ) बँकेचा दिनांक ३१ डिसेंबर १९५६ अखेरचा ताळेबंद, नफातोटापत्रक आणि संचालक मंडळाचा व ऑडिटरांचा रिपोर्ट यांचा विचार करणें.

* ( २ ) डिव्हिडंड मंजूर करणें.

( ३ ) निवृत्त होणाऱ्या ( फेरनिवडणुकीस पात्र असलेल्या ) तीन संचालकांचे जागीं संचालकांची निवडणूक करणें.

( ४ ) ऑडिटर्स नेमणें व त्यांचा मुशाहिरा ठरविणें.

पुणें शहर,
२२-१-१९५७

बोर्डाचे हुकुमावरून
चिं. वि. जोग,
मॅनेजर.

विशेष सूचना :

( अ ) सभेस उपस्थित राहण्यास व मतदानास पात्र असलेल्या भागीदारांस स्वतःऐवजीं सभेस उपस्थित राहण्यासाठीं व मतदान करण्यासाठीं प्रॉक्झी म्हणून दुसऱ्या व्यक्तीची नेमणूक करतां येईल आणि प्रॉक्झी भागीदार असलाच पाहिजे असें नाहीं.

( ब ) बँकेचीं शेअर ट्रॅन्स्फर बुकें दिनांक १८ फेब्रुवारी १९५७ ते २६ फेब्रुवारी, १९५७ ( दोन्हीं दिवस धरून ) बंद राहतील.

* डिव्हिडंड मंजूर झाल्यानंतर तें शनिवार दिनांक ९ मार्च १९५७ पासून दिलें जाईल. डिव्हिडंड वॉरंटस भागीदारांच्या नोंदवलेल्या पत्त्यावर टपालानें पाठविलीं जातील. पत्ता बदलला असल्यास बँकेकडे सत्वर कळवावें.

## बँकांच्या चालू गाड्यांत खीळ

### बँकिंग कंपन्यांच्या कायद्यांतील दुरुस्त्या

[ बँकिंग कंपन्यांच्या कायद्यांत दुरुस्ती करणारा कायदा १४ जानेवारी, १९५७ रोजीं अंमलांत आला. ]

सर्वांत महत्त्वाचा बदल ३५ कलमाच्या पुढें ३५ अ व ३५ ब हीं कलमें घालून करण्यांत आला आहे. या कलमान्वयें रिझर्व्ह बँकेला राष्ट्रहिताच्या दृष्टीनें आवश्यक वाटेल तेव्हां, एखाद्या बँकेच्या कारभारांत हस्तक्षेप करून ठेवीदारांचे हितसंबंध सुरक्षित ठेवणें अत्यावश्यक आहे असें वाटेल तेव्हां किंवा सर्वसामान्यपणें चांगली व्यवस्था ठेवली जाण्यासाठी कुठल्याहि बँकेला अगर सर्व बँकांना कांहीं आदेश देण्याचा सर्वाधिकार मिळाला आहे व तो बँकांवर बंधनकारक आहे. हे आदेश कमीजास्त प्रमाणांत वाढवण्याचा वा रद्द करण्याचाहि तिला अधिकार आहे. पूर्वीच्या कायद्यामध्यें देखील असा अधिकार होता, याचें उदाहरण नुकत्याच रिझर्व्ह बँकेनें तांदूळ, सूत, वगैरेंवर दिल्या जाणाऱ्या कर्जांच्या बाबतींत दिलेल्या आदेशावरून देतां येईल. पण त्याची व्याप्ति मात्र नवीन सुधारणेइतकी व्यापक नव्हती. तसेंच नवीन दुरुस्तींत रिझर्व्ह बँक असा आदेश ज्या ज्या वेळेला काढूं शकेल त्यांत 'राष्ट्रहित' व 'ठेवीदारांचे हितसंबंध' यांची जास्त भर घालण्यांत आली आहे. यामुळें सर्वसामान्यपणें बँका राष्ट्रहितविरोधी गोष्टींत हात घालतात असें अप्रत्यक्षपणें सूचित होतें तें बँकांना अन्याय्य व अपमानकारक आहे. प्रत्यक्ष परिस्थितीचें समालोचन केलें तर बँकांनीं वेळोवेळीं राष्ट्रहिताच्याच अनेक गोष्टी केल्याचें दृष्टोत्पत्तीस येईल. अर्थमंत्र्यांनीं जाणूनबुजून तिकडे कानाडोळा करावा ही खेदाची गोष्ट आहे. अर्थात् एखाद्या बँकेनें एखाद्या वेळेला एखादी बाधक गोष्ट केली असेल; पण त्यामुळें सर्व धंद्याला बदनाम करून, कोरड्याबरोबर ओलेंहि जाळण्याचा हा प्रयत्न मात्र टीकेसच पात्र आहे. दुसरें म्हणजे पूर्वी रिझर्व्ह बँकेला व्यापक अधिकार असूनहि त्याचा उपयोग पाहिजे तितका झाला नाहीं असे अनेक तज्ज्ञ म्हणत आहेत. ही दुरुस्ती झाल्यानंतरहि तिचा उपयोग वेळेवर होईलच असें समजण्यास काय प्रमाण आहे? ३५ ब कलमान्वयें मुख्य व्यवस्थापकाच्या नेमणुकीला रिझर्व्ह बँकेची संमति लागेल. केवळ मेमोरँडम वा आर्टिकल्सच्या कलमांमुळें, किंवा पूर्वकरारामुळें किंवा संचालकांच्या ठरावामुळेंच ती नेमणूक बंधनकारक होणार नाहीं. यापुढें होणाऱ्या प्रत्येक नेमणुकीला रिझर्व्ह बँकेची अनुमति लागेल. अर्थात् अशी संमति मिळण्यापूर्वी त्या व्यवस्थापकानें केलेलीं कुठलींहि कामें वा करार रद्दबातल ठरणार नाहींत.

### रिझर्व्ह बँकेचें निरीक्षण

कलम ३६ मधील बदलहि असाच मूलभूत आहे. त्यायोगें रिझर्व्ह बँकेला ३५ व्या कलमान्वयें तपासणी घेतल्यानंतर वा ती घेत असतां संचालकांची सभा बोलावून तींत बँकेच्या कारभाराची चर्चा करण्याचा अधिकार दिला गेला आहे व त्या व त्यापुढील संचालकांच्या सभांना आपला निरीक्षक पाठवण्याचा हक्क मिळाला आहे. हा निरीक्षक त्या त्या सभेंत संपूर्ण भाग घेईल, त्या त्या सभेचीं त्याला निमंत्रणें व मिनिट्स् वगैरे सर्व देण्यांत येईल व त्यावर त्याला रिझर्व्ह बँकेकडे अहवाल करण्याचाहि हक्क राहील आणि या अहवालान्वयें जर रिझर्व्ह बँकेनें त्या बँकेच्या कारभारांत कांहीं सुधारणा सुचविली तर ती अंमलांत आणावी लागेल.

निरीक्षक नेमण्याचा हा अधिकार रिझर्व्ह बँकेला देण्यानें

**कण आणि क्षण**
( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )
लेखक : –श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"
मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. २ रु. ८ आ.

सांडू
प्रेग-यूटेरो
गर्भिणी-गर्भ-रक्षक


दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर लि.
चेंबूर-मुंबई.

खर्चात बचत करा व पैसा शिलकीत टाका
सारस्वत
को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.
सोनें व सोन्याचे दागिने यांच्या तारणावर माफक दरानें कर्जें दिलीं जातात.

शाखा:
फोर्ट, दादर, माहिम, पुणें, बेळगांव.

किर्लोस्कर लहान, मोठे
लोखंडी नांगर

भारी, मध्यम प्रतीच्या व रेताड जमिनींच्या सर्वोत्कृष्ट नांगरटीसाठीं निरनिराळ्या बनावटीचे योग्य असे लहान व मोठे नांगर तयार होतात. आपल्या जमिनीच्या मगदुराप्रमाणे नांगरांची निवड करा.
किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी, द. सातारा.

बँकांच्या संचालक मंडळाच्या सभेंत जी गुप्तता असते ती जाईल असा आरोप अनेक मान्यवर लोकांनीं केला; पण त्यावर रिझर्व्ह बँकेपासून बँकांनीं कांहींहि गुप्त ठेवूं नये असें सांगण्यांत आलें. बँकांच्या संचालकांचीं गुप्त सलवतें हीं नेहमीं 'कट' या अर्थाचीं असावींत असा गैरसमज अर्थमंत्र्यांनीं करून घेतला आहे काय न कळे. या 'निरीक्षक' शब्दाचा अर्थ कसा असतो, त्याचे अधिकार कसे असतात याची कल्पना लोकांना यूनोचे 'निरीक्षक' आहेत त्यांवरून येऊं शकेल. दुसरें म्हणजे, असा निरीक्षक हा कुठल्याहि पूर्वग्रहाला बळी न पडतां आपला अहवाल पाठवील याची खात्री सर्वसाधारण बँकांनीं कशी बाळगावी! तिसरें, हा निरीक्षक त्या त्या बँकेच्या मुरब्बी अधिकारी व संचालक यांच्याच तोलाचा असला पाहिजे. त्या दृष्टीनें निरीक्षकांची पात्रता काय असावी याचा खुलासा कायद्यांत झाला असतां तर बरें झालें असतें. अशा निरीक्षकापासून परत प्रत्यक्ष फायदा किती होईल याची वानवाच आहे. कारण आतांपर्यंत झालेल्या तपासणीवरून रिझर्व्ह बँक कांहीं जबाबदारी स्वीकारून मार्गदर्शन करते असें दृष्टोत्पत्तीस आलेलें नाहीं. श्री. भाभा यांच्या म्हणण्याप्रमाणें रिझर्व्ह बँक सर्व अधिकार आपल्या हातीं घेते व त्यामुळें येणारी जबाबदारी मात्र घेत नाहीं, हें खरें वाटूं लागतें.

यानंतर ४६ कलमामध्यें बँकेचा प्रत्येक नोकर हा 'पब्लिक सर्व्हंट' समजला जाईल व त्याला भारतीय पिनल कोडाचा ९ वा भाग लागूं होईल. तसेंच लांचलुचपत प्रतिबंधक कायदाहि त्याला लागू पडेल. या नवीन सुधारणेनें कांहीं फायदा होण्याऐवजीं अनेक लोकांच्या हातांत तें एक कोलीतच मिळेल आणि स्वतःचे हेतू साधण्यासाठी दुष्ट प्रकृतीच्या व्यक्तीकडून हें एक साधन म्हणून उपयोगांत आणलें जाईल व त्यांत निरपराधी व्यक्तींना उगीचच झळ लागेल. बँकांतून फार मोठ्या प्रमाणावर लांचलुचपतीचे प्रकार होत होते कीं, काय असें सर्वसामान्य माणसाच्या एकदम मनांत यावें, अशाच तऱ्हेनें हा बदल अंतर्भूत करण्यांत आला आहे.

भारतीय बँकांनीं गेल्या दहा वर्षांत आपल्या कुवतीप्रमाणें प्रगति करून दाखविली आहे, वेळोवेळीं सरकारला मदत केली आहे, सरकारी कामांसाठी कंत्राटदारांनाहि कर्जद्वारें मदत केली आहे व सर्वसामान्य जनतेची सेवा बजावली आहे. अशा वेळीं 'प्रायव्हेट सेक्टर' ला पाठिंबा देण्याऐवजीं सरकार आपल्या कृतीनें त्याच्या चालू गाड्यांत खीळ मात्र आणीत आहे व पर्यायानें प्रगतीला अडथळा येत आहे. अर्थात् यांत चूक कोणाची आहे हें काळच ठरवील.

—चिं. वि. जोग, [ मॅनेजर, "बँक ऑफ महाराष्ट्र" ] "संपदा" जानेवारी, १९५७.

---

**प्रायोगिक दूरदर्शन केंद्र**— दिल्ली येथें एक प्रायोगिक दूरदर्शन केंद्र उभारण्यांत येत आहे. टेलिव्हिजनचा उपयोग शिक्षण, करमणूक व ग्रामोद्धार ह्या कार्यांसाठी कितपत होऊं शकेल तें अजमावण्यासाठी त्याची उभारणी करण्यांत येत आहे. ह्या केंद्रासाठी ३ लाख रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. भारताच्या दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत टेलिव्हिजनच्या विकासासाठी ४० लाख रुपये मंजूर करण्यांत आले आहेत.


## अन्नाचें रहस्य




**बेडेकर मसाले, लोणचीं, पापड**
ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.

★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★

दुकानें—मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ
— दृ. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —

## कण आणि क्षण

ह्या अत्यंत लोकप्रिय ( दोन वर्षांत दोन मराठी व दोन गुजराती आवृत्त्या ) पुस्तकाचे कर्ते
श्री. श्री. वा. काळे संपादक, "अर्थ" ह्यांचें

# पुढे पाऊल

चित्ताकर्षक विवेचन असलेल्या मार्गदर्शक लघुनिबंधांचा संग्रह.

पृ. सं. १३२ ] आर्यभूषण प्रेस, पुणें ४. [ किंमत २ रु.

# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

## मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.

शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७७,००० |

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष.
न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. कृ. खोले.
श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. वेवी
श्री. बा. ग. भंडुके.

सरकारी रोखे खरेदी—विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.
दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी
मॅनेजर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.